नियमीत दिवाणी दावा क्र ९८/२०२३
समाधान वि शासन
निशाणी क्र ८४

<u>वादीचा साक्षीदार क्र १ - समाधान चा शपथेवर उलटतपास सुरु</u>

<u>प्रतिवादी क्र १ ते ४ व विधिज्ञ गैरहजर, सबब उलटतपास काही नाही.</u>

<u>प्रतिवादी क्र ५ व ६ करीता वकील, श्री एन के तांबीले यांचेमार्फत</u>

१. माझा जन्म १९७६ सालचा असून मी चौथी पास आहे. प्रतिवादी क्र ८ गोरख मारुती देशमुख हे माझे वडील होय. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यातील गट क्र ९०३ हा माझे वडील गोरख यांचा वडीलार्जीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र ९०३ मधील २ हेक्टर मिळकत माझे वडील गोरख यांनी इसम नामे, महादेव बाबू माळी यांना विकलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, विक्रीनंतर महादेव बापू माळी यांच्या क्षेत्रास गट क्र ९०३/१ व उर्वरीत वडीलांच्या नावे राहिलेल्या मिळकतीस गट क्र ९०३/२ असे गट क्रमांक पडले. हे म्हणणे खरे आहे की, महादेव बापू माळी यांनी त्यांचे क्षेत्र ज्या इसमास पुढे विक्री केले आहे, त्या इसमांना मी दाव्यात पक्षकार म्हणून सामील केलेले नाही.

२. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र ९०३ मधून पंढरपूर-केम हा दक्षिणोत्तर चालीचा राजरस्ता गेलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्यामुळे गट क्रमांक ९०३ चे क्षेत्र दोन भागात म्हणजे रस्त्याच्या पूर्व व पश्चिम भागात विभागले गेलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांच्या नावे गट क्रमांक ९०३/२ या मिळकतीमधून वडिलांनी महिला नामे, पद्मिनी खडके हिला ८० आर क्षेत्र विक्री केले आहे. पुढे पद्मिनी खडकेने इसम नामे, रामदास सखाराम भोसले यास विक्री केले आहे. पद्मिनी खडके व रामदास भोसले यांना दाव्याकामी पक्षकार केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पद्मिनी खडके हिला ८० आर क्षेत्र विक्री केल्यानंतर वडिलांकडे राहिलेल्या क्षेत्राचे त्यांनी वाटप केलेले आहे. प्रकरणातील प्रतिवादी क्र ७ बेबी सरडे ही माझ सख्खी बहीण असून, तिला पश्चिमेकडील १ हेक्टर ५१ आर क्षेत्र वाटपात वडिलांनी दिले आहे व पूर्वेकडील ३ हेक्टर २० आर इतके क्षेत्र माझा भाऊ कर्ण गोरख देशमुख यास दिलेले आहे.

**३.** हे म्हणणे खरे आहे की, तसेच ३ हेक्टर क्षेत्र वाटपात मला देण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाटपात झालेल्या फेरफारामध्ये मला स्वतःला बहीण बेबी व भाऊ कर्ण या दोघांच्या हिश्यामधील क्षेत्र देण्यात आलेला आहे असा उल्लेख आहे. साक्षीदार स्वतःपुढे सांगतो की, आमचे वाटप तोंडी झालेले असून मला फारसे वाचता येत नाही, आम्ही तोंडी वाटपाप्रमाणे जमिनी वहिती करीत आलेलो आहे. आता मला दाखवलेला फेरफार क्र २६३३ निशाणी ८४/६ यामध्ये वाटप हे १९९३ साली झाल्याचा संदर्भ व उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर फेरफार क्र २६३३ मध्ये मला ३ हेक्टर क्षेत्र देण्यात आलेले आहे असा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९३ साली झालेल्या वाटपाबाबत मी स्वतः अगर माझा भाऊ कर्ण व बहीण बेबी यांनी कोणताही वाद उपस्थित केलेला नव्हता व नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसेच प्रतिवादी क्र ७ बेबी सरडे हिला वाटपात देण्यात आलेल्या क्षेत्राबद्दल आमचा कोणताही वाद नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र ७ बेबी हिने तिला वाटपात मिळालेले क्षेत्र पुढे प्रतिवादी क्र ५ सुमन मोरे हिला विक्री केले आहे.

**४.** हे म्हणणे खरे आहे की, मला वाटपात मिळालेल्या मिळकतीस पुढे गट क्रमांक ९०३/२/ब देण्यात आलेला आहे व माझी बहीण बेबी हिने केलेल्या क्षेत्रास पुढे गट क्रमांक ९०३/२/अ देण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला आलेल्या क्षेत्रामधील ४० आर क्षेत्र पुढे मी इसम नामे, दत्तू, हणुमंत, महादेव संभाजी डोके या इसमांना माझा गट क्रमांक ९०३/२/ब यातील मिळकत विक्री केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, पुढे गट क्रमांक ९०३/२/ब यातील ४८ आर क्षेत्र प्रतिवादी क्र ६ लिंबाजी व इसम नामे पांडूरंग कृष्णा शिंदे यांना विक्री केले आहे. साक्षीदार स्वतःहून पुढे सांगतो की, पांडुरंग धूमाळ व पांडूरंग शिंदे यांना ५ एकर क्षेत्र मी विकलेले आहे. इसम नामे, प्रसाद लिंबाजी मोरे याच्या नावे गट क्रमांक ९०३/२/ब यातील ५९ आर क्षेत्र नावे आहे किंवा काय हे मी ठामपणे सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, इसम नामे, सतीश पांडूरंग शिंदे यांच्या नावे सदर गटातील १ हेक्टर क्षेत्र नावे आहे.

**५.** हे म्हणणे खरे आहे की, मी विक्री केलेले क्षेत्र वगळता गट क्रमांक ९०३/२/ब या गटात महसूल अभिलेखाप्रमाणे ५३ आर क्षेत्र शिल्लक दाखवलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते ५३ आर क्षेत्र माझ्या प्रत्यक्ष वहिवाटीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ९०३/२/ब यातील उताऱ्यावर जितके इसम हक्कदार दर्शविलेले आहेत, त्या सर्वांना मी दाव्याकामी पक्षकार केलेले नाही. दाव्यात नमूदप्रमाणे क्षेत्र महसूल अभिलेखात नोंदविलेले आहे, असा ७/१२ उतारा मी

प्रकरणात दाखल केलेला आहे. आता मला निशाणी ८४/३ सोबत एकत्रात दाखल कागदपत्रातील वादमिळकतीचा दाखल असलेला उतारा दाखवला. सदर उताऱ्यात माझ्या मिळकतीचे एकुण क्षेत्र ३ हेक्टर इतके दर्शविलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यात नमूदप्रमाणे ३ हेक्टर ३९ आर क्षेत्र ७/१२ उताऱ्यात नमूद नाही. वादमिळकतीचे क्षेत्र ३ हेक्टर ३९ आर इतके आहे असे दाखविणारे कागदपत्र माझ्याकडे नाही. दाव्यात नमूदप्रमाणे गट क्रमांक ९०३/२/ब या मिळकतीच्या चतुःसिमा आहेत असे दाखविणारा शासकीय अभिलेख प्रकरणात दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ९०३/२/ब यामध्ये जे इतर धारक दर्शविलेले आहेत, त्यांच्या क्षेत्राबद्दल व त्यांचा आपसात वाद नाही.

६. वादमिळकती संदर्भातील वाटप कार्यवाहीच्या कागदपत्रात हेराफेरी झाली आहे, याबाबत मी आजतागायत महसूल अधिकारी अगर न्यायालया समोर वाद उपस्थित केलेला नाही. वादमिळकती मधील ३ हेक्टर ३९ आर क्षेत्र माझ्या प्रत्यक्ष ताब्यात आहे असे दाखविणारे उतारे मी दाखल केले आहे. मुळ गट क्रमांक ९०३ याच्या झालेल्या पोटहिस्साची मी मोजणी आजतागायत केलेली नाही. तसेच विक्री केलेल्या क्षेत्राची देखील मी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालयाकडुन मोजणी करुन घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकतीमध्ये माझे ९३ आर क्षेत्र शिल्लक आहे असे दाखविणारे कोणतेही कागदपत्र माझ्याकडे उपलब्ध नाही. वाटपानंतर गट क्रमांक ९०३ च्या क्षेत्राबाबत मेळ बसत नाही याकरीता मी स्वतः, माझे वडील अगर भाऊ याने महसूल अधिकाऱ्याकडे तक्रारी अर्ज केलेला नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ९०३/१/अ याबाबतचा स्वतंत्र उतारा इसम नामे, शंकर यशवंत सावंत यांच्या नावे झाला आहे. सदर इसमास दाव्यात पक्षकार केलेले नाही. सदर इसमाच्या क्षेत्राबाबत माझा कोणताही वाद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला वाटपात मिळालेले क्षेत्र रस्त्याच्या पुर्व-पश्चिम बाजुस रस्त्यामुळे विभागलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याच्या पूर्व बाजुच्या क्षेत्राच्या उत्तर बाजुस गट क्रमांक ९०३/१ चे क्षेत्र आहे. रस्त्याच्या पुर्व बाजुस असलेल्या माझ्या क्षेत्राच्या दक्षिण बाजुस गट क्रमांक ९०३/२/क या धारकांचे क्षेत्र आहे. रस्त्याच्या पश्चिम बाजुस माझ्या असलेल्या क्षेत्राच्या दक्षिण बाजुस गट क्रमांक ९०३/२/ड मध्ये रामदास सखाराम भोसले या धारकांचे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पश्चिम बाजुस व रामदास भोसलेच्या देखील पश्चिम बाजुस प्रतिवादी क्र ५ सुमन हिचे क्षेत्र आहे.

८. गट क्रमांक ९०३ च्या दक्षिण बाजुकडुन सिना-माढा हा पाण्याचा कालवा / पाट गेलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, कालव्याच्या लगत दक्षिण बाजुकडे माझे कोणतेही क्षेत्र लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र ५ चेच केवळ क्षेत्र कालव्याच्या दक्षिण बाजुस लगत येत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ९०३ मध्ये पुर्व बाजुकडील केवळ क्षेत्र माझ्या प्रत्यक्ष वहिवाटीत आहे. साक्षीदार पुन्हा सांगतो की, कॅनॉलच्या कडेला आजरोजी क्षेत्र माझ्या वहितीत आहे. कॅनॉलच्या लगत क्षेत्र माझ्या प्रत्यक्ष कब्जात आहे असे दाखवणारे कागदपत्र माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, कॅनॉल लगत सद्यस्थितीत व आजमितीस माझी कोणतीही वहिवाट नाही. हे म्हणणे खरे नाही की, कॅनॉलमध्ये संपादीत झालेल्या क्षेत्राचा केवळ लाभ मिळावा यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात नमूदप्रमाणे सिना-माढाप्रकल्प टेंभूणी उपपाटा क्र १ चा कॅनॉल हा माझ्या वहिवाटीच्या ९२ आर क्षेत्रामधून गेलेला आहे असे मी खोटे कथन दाव्यात केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी वादमिळकतीवर मागील २५ वर्षांपासून कोणत्याहीप्रकारे वहिवाट नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र ५ हिला कॅनॉलकरीता संपादीत झालेल्या क्षेत्राचा आर्थिक लाभ मिळू नये या हेतूने प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र ५ हिच्या क्षेत्रात ऊस तोडण्यासाठी कामगार आले असता, मी त्यांना हरकत घेवून त्यांना हाकलून लावले.

९. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ९०३/२/ब यात केवळ ५३ आर इतक्या क्षेत्रावर माझी मालकी व कब्जा आहे. हे म्हणणे खरे नाही की, पुरावा शपथपत्र व दाव्यातील कथन खोटे असे केलेले आहेत व आजदेखील खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र ७ व ८ यांचा पुकारा करता गैरहजर, सबब उलटतपास काही नाही.**

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

KARADE RATILAL MACHINDRA

Digitally signed by KARADE RATILAL MACHINDRA
Date: 2025.10.10 12:57:02 +0530

(आर एम कराडे)

दिनांक - १०/१०/२०२५. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, माढा.